**Sagar Bendre,**
**B.E, Electrical**
**Seva Mandir**



खरंतर तर प्रत्येक व्यक्तीला जगताना समाजासाठी काहीतरी करावे असे वाटते. मात्र 'समाज' ची व्याप्ती प्रत्येकासाठी वेगवेगळी असते. कोणासाठी कुटुंबापूर्ती मर्यादित असते, कोणासाठी कुटुंब, मित्रपरिवार, गाव साठी मर्यादित असते, कोणासाठी आणखी काही वेगळं..यानुसारच प्रत्येक व्यक्तीचा जीवनात सेटल होण्याच्या दृष्टीकोनातून शिक्षण (करिअर), जीवनासाठी लागणार पैसा कमावण्याचा, गरजा, मुख्य उद्देश याचा वेगवेगळा प्राधान्यक्रम असतो.

आपण जर थोडं मागे वळून मुख्यतः तरुण पिढीच्या जीवनातील आत्ताच्या मुख्य उद्देशाकडे पाहिले तर लक्षात येते की;

स्वातंत्र्य मिळालं त्यावेळी जी पिढी तरुण होती (20-30 वर्ष) ती पिढी म्हणजे आत्ता 90-100 त असणारी पिढी, यांच्याकडे पाहिले तर समजते की ही पिढी अजूनही निसर्गाच्या जवळ राहणं पसंद करते, त्यांच्या गरजा कमी आहेत , त्यांच्या जीवनात पैशाला अति महत्व नाही, माणुसकीवर भर आहे, पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या विचारावर विश्वास आहे. ही पिढीच ध्येय हे खूप जास्त समाजकेंद्री दिसते! तरुणाईच्या काळात या पिढीचा मुख्य भर स्वातंत्र्य मिळवण्यावर होता..

आत्ता जी पिढी 60-70 त आहे; म्हणजे 1970-80 ची तरुण पिढी; स्वातंत्र्य मिळून 20 वर्षे होऊन गेली होती, त्यांचा मुख्य भर जीवनात स्थिरता मिळवण्यावर, सेटल होण्यावर म्हणजे मुख्य गरजा अन्न ,निवारा इ ची पूर्तता करण्यावर होता. त्या दृष्टीकोनातून सरकारी नोकरीस जास्त प्राधान्य देण्यास सुरुवात झाली. शिक्षणाच्या प्रवाहात जाणारी पिढी वाढू लागली. ही पिढी खूप मोठ्या संक्रमांतून गेली आहे. आज पिढीकडे पाहिले तर एक समतोल जीवन समजतं.

आता जी पिढी 40- 50 त आहे: म्हणजे 1990-2000 मधील तरुण पिढी. या पिढीत शिक्षण प्रवाहातील टक्का वाढला...सेटल होण्याच्या दृष्टीने नोकरीवर जास्त विश्वास बसू लागला. सरकारी नोकरीच प्रचंड आकर्षण, जागतिकीकरण, औद्योगिकरण भरात असल्याकारणे तिकडेही बराच प्रवाह वळला, व्यवसायही काही प्रमाणात वाढले.पैस्याच महत्व वाढू लागलं. गरजा वाढत गेल्या...मोठ्या प्रमाणात सामाजिक कुटुंबव्यवस्था स्थिर

करण्यामध्ये या पिढीचा मोठा वाटा.. निसर्ग, समाजजीवन यांतील ecosystem मात्र खूप बदलत गेली;यास या पिढीचा मोठा हात..
पुढील दोन दशकांतील पिढी यांचाच वसा घेत संक्रमण करत आहे..दिवसेंदिवस जीवनात सेटल होण्याची व्याख्या बदलू लागली..सामाजिक क्षेत्राची संकल्पना बदलू लागली.
पुढे हळूहळू IT सेक्टर वाढू लागले...चंगळवाद वाढू लागला..एका स्तरावर आलेली स्थिर कुटुंबव्यवस्था बदलू लागली. शिक्षण, माहिती क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढू लागलं... 'स्वातंत्र्य' आणखी वृद्धिंगत होणं सुरू झाली. ही पिढी खूप जास्त स्वकेंद्रित होऊ लागलीं.

आता बोलुत आता 18-28 मधील पिढीबद्दल, यांच्या जीवनात सेटल होण्याचा प्राधान्यक्रम खूप जास्त बदलताना दिसतो. जगण्यासाठीच्या मुख्य गरजा सहज पूर्ण होऊ लागल्या.. Lifestyle च नवीनच वार सुरू झालं...पैसा कमविणे, गमविणे सर्व काही सोप्प झालं.नोकरी बाबत आकर्षण, निराशा असं चक्र सुरू झालं..बराच प्रवाह व्यवसायाकडे वळू लागला..
भूतकाळातील अनुभव, सध्याचे संक्रमण, भविष्यातील प्रश्न याआधारे या पिढीतील मोठ्या भागास थोडं वेगळं अस काहीतरी करण्यास रस वाटू लागला आहे. अनेकांस थोडं अधिक सामाजिक अस काहीतरी करायची इच्छा होऊ लागली आहे... यातून काही activity based social work अस काहीतरी वाढू लागलं आहे. खरं तर Happiness ची संकल्पना बदलू लागली आहे. प्राकृतिक जीवनपद्धतीचं आकर्षणही वाढू लागलं आहे. खरंतर मोठ्ठा प्रवाहास स्वकेंद्रिततेवर प्रश्न पडू लागला आहे.
अस सर्व असताना सध्याचा प्रवाह, इच्छा, गरजा, मार्ग या अर्थाने अनेक प्रश्न पडू लागले आहेत. यांची उत्तर शोधणं हे गरजेचं तर आहेच..पण ते कसं शोधू असा मुख्य प्रश्न अनेकांस पडतो आहे?

असा प्रश्न पडलेल्या अस्वस्थ तरुणांसाठी मी 'निर्माण' ची शिबिरप्रक्रिया सुचवू इच्छितो.